# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,४९,
खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा ( पूर्व), मुंबई - ४०० ०५१
फोन न. २६४७ ४८ ९२ फॅक्स न. २६४७ १६१९ ई मेल - jtdirrom@gmail.com


क्र. ३/विकामुं/तंशि/लेखा-४/२०१९/१४२१
दिनांक :- 22 MAY 2019

प्रति,
मा.आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष/प्रवेश नियामक प्राधिकरण
शुल्क नियामक प्राधिकरण
सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परिक्षा मंडळ/विभागीय कार्यालय परिक्षा मंडळ
कुलसचिव/संचालक/प्राचार्य
या कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व
अशासकिय अनुदानित पदवी व पदविका संस्था

विषय — एचटीई सेवार्थ प्रणालीअंतर्गत देयके सादर करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, एचटीई सेवार्थ प्रणालीअंतर्गत दरमहा या कार्यालयास आपल्या संस्थेची वेतनदेयके सादर करण्यात येतात. एचटीई सेवार्थ प्रणाली मध्ये अद्यापपर्यंत 'कर्मचारीनिहाय बदल दर्शविणारे प्रपत्र (Change Statement)' तयार होण्याची सुविधा उपलब्ध झालेली नाही.

संस्थेने अधिकारी/कर्मचा-यांच्या वेतनात बदल केल्यास, देयकात थकबाकी आहारित केल्यास वा इतर बाबीमुळे वतेनदेयकाच्या एकूण रकमेमध्ये आणि निव्वळ रकमेमध्ये बदल झाल्यास, त्याबाबतची अचूक माहिती वेतन पडताळणीच्या वेळी या कार्यालयास उपलब्ध होत नाही. सदर माहिती शासनाकडून उपलब्ध होणा-या अनुदानासंबंधी आवश्यक आहे.

या पत्रासोबत जोडलेल्या 'कर्मचारीनिहाय बदल दर्शविणारे प्रपत्र (Change Statement)' या नमूना प्रपत्रात दर्शविण्यात आल्यानुसार **माहे मे,२०१९ च्या वेतनदेयका** पासून संस्थेने दरमहा वेतनदेयकात होणा-या बदलांची माहिती तयार करुन सादर करणे आवश्यक आहे. सदर माहिती कर्मचारीनिहाय सादर करण्यात यावी. एखाद्या महिन्याच्या वेतनदेयकात मागिल महिन्याच्या रकमेत व चालू महिन्याच्या रकमेत बदल नसल्यास प्रपत्र 'अ' निरंक दर्शविण्यात यावे, मात्र प्रपत्र 'ब' मध्ये योग्य ती माहिती सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रपत्रासोबत मागिल महिन्याच्या Outer page ची प्रत जोडण्यात यावी.

सदर प्रपत्र तयार करताना काही अडचणी उद्भवल्यास या कार्यालयाच्या लेखा विभागाशी संपर्क करण्यात यावा.

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण,विभागीय कार्यालय,मुंबई

# LETTER HEAD

## माहे ________ २०१९ च्या वेतनातील कर्मचारीनिहाय बदल दर्शविणारे प्रपत्र

आहरण व सवितरण अधिकाऱ्याचे क्र. व पदनाम :- (०७७१०१०००__/______________________)

**प्रपत्र - अ**

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | बदलाचे स्वरूप (वेतनातील प्रत्येक शिर्षकाची वेगळी नोंद दाखवावी) | माहे _____२०१९ महिन्याची रक्कम (चालू महिना) | माहे _____२०१९ महिन्याची रक्कम (मागील महिना) | बदलाचा रक्कमेवर होणारा परिणाम (६=४-५) (+/-) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **वेतन व ई. भत्ते यात होणाऱ्या बदला बाबतची माहिती** | | | | | | |
| १. | A | Basic | XXX | XXX | XX | |
| २. | A | GP | XXX | XXX | XX | |
| ३. | A | DA | XXX | XXX | XX | |
| ४. | A | CLA | XXX | XXX | XX | |
| ५. | A | TA | XXX | XXX | XX | |
| **(अ) वेतन व ई. भत्ते यात होणाऱ्या बदलाची एकूण रक्कम (Gross Amount)** | | | | | XXX | |
| **वजातीमध्ये होणाऱ्या बदला बाबतची माहिती** | | | | | | |
| ६. | A | GPF | XXX | XXX | XX | |
| ७. | A | DCPS | XXX | XXX | XX | |
| ८. | B | Basic | XXX | XXX | XX | |
| ९. | B | GP | XXX | XXX | XX | |
| **(ब) वजातीमध्ये होणाऱ्या बदलाची एकूण रक्कम (Deduction)** | | | | | XXX | |
| (क) एकूण बदलाची रक्कम (अ-ब) (Net Amount) | | | | | **XXX** | |
| (ड) माहे _____२०१९ च्या देयकाची निव्वळ रक्कम (चालू महिना) | | | | | XXX | |
| (इ) माहे _____२०१९ च्या देयकाची निव्वळ रक्कम (मागिल महिना) | | | | | XXX | |
| (फ) फरकाची रक्कम (ड-इ) | | | | | **XXX** | |

**प्रपत्र - ब**

| | एकूण स्थूल रक्कम | एकूण वजाती | एकूण निव्वळ रक्कम |
|---|---|---|---|
| माहे _____२०१९ च्या देयकाची रक्कम (चालू महिना) | XXX | XXX | **XXX** |
| माहे _____२०१९ च्या देयकाची रक्कम (मागील महिना) | XXX | XXX | **XXX** |
| देयकातील फरकाची रक्कम | **XXX** | **XXX** | **XXX** |

मी असे प्रमाणित करतो/करते की माहे _______ २०१९ या मागील एच.टी.ई. सेवार्थ प्रणालीतून निर्गमित केलेले देयक व त्यात दर्शविलेल्या कर्मचारीनिहाय सर्व प्रदान व वसुलीच्या रक्कमा मी तपासल्या असून त्यानुसार करण्यात आलेले प्रदान अचूक आहेत. ज्यामध्ये बदल आवश्यक आहे तो उपरोक्त तक्त्यांमध्ये समाविष्ट केला आहे.

**आहरण व सवितरण अधिकाऱ्याची सही व शिक्का**